# मुंबई विद्यापीठ

क्र.मासंविक/आयसीडी/२०२५-२६/३३८

**प्रशासकीय गुणवत्ता अभियान व प्रशासकीय गुणवत्ता पुरस्कार**

**परिपत्रक : -**

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, संचालक, ज्ञानस्तोत्र केंद्र, संचालक, जमनालाल बजाज व्यवस्थापन संस्था, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, संचालक, दुरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र, वित्त व लेखा अधिकारी, पीठासीन अधिकारी, सर्व शैक्षणिक विभागांचे प्रमुख, अध्यक्षा, महिला विकास कक्ष, जे. पी. नाईक भवन, विद्यानगरी परिसर, मुख्य सुरक्षा अधिकारी, विद्यापीठ अभियंता, वसतीगृह अधिक्षक, विद्यानगरी, चर्चगेट 'बी' व 'सी' रोड, समन्वयक, रत्नागिरी उपपरिसर, ठाणे उपपरिसर, सिंधुदुर्ग उपपरिसर, समन्वयक, स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अॅड अप्लाईड सायन्सेस, कल्याण उपकेंद्र, स्था. नियंत्रक, मुद्रण व लेखनसामुग्री, विद्यापीठ अभियंता,सर्व उपकुलसचिव, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे / कक्षांचे प्रमुख यांना कळविण्यात येते की, प्रशासकीय गुणवत्ता अभियाना अंतर्गत व प्रशासकीय गुणवत्ता पुरस्कार योजनेच्या अंतर्गत विद्यापीठातील प्रशासकीय व शैक्षणिक विभागांना गुणवत्ता पुरस्कार प्रदान करण्यासंदर्भात मुल्यांकन करण्यासाठी मा. कुलगुरुंनी गठीत केलेली समिती दिनांक ३०/०६/२०२५ रोजी फोर्ट परिसर येथील विभागांना तसेच दिनांक ०१/०७/२०२५ रोजी विद्यानगरी, परिसर येथील विभागांना प्रत्यक्ष भेट देऊन निरीक्षण करणार आहेत.

सर्व प्रशासकीय विभागांनी मानव संसाधन विकास कक्षाच्या क्र.मासंविक/आयसीडी/२०२४-२५/८९९ दिनांक ११ डिसेंबर, २०२४ च्या परिपत्रकासोबत जोडलेल्या अर्जातील सुचनांचे तंतोतंत पालन करावे. तसेच संचालक, समन्वयक/विभाग प्रमुख/उपकुलसचिव/सहायककुलसचिव यांनी विभागांच्या कामाचे व उपलब्धी संदर्भात सादरीकरण करावयाचे आहे. तरी सर्व विभागांनी सदर परीक्षणासाठी तत्पर व सजग असावे याची सर्वांनी नोंद घ्यावी.

(डॉ. प्रसाद कारंडे)
कुलसचिव

मुंबई — ४०० ०३२
दिनांक :- २६ जून, २०२५